दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)




छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक २०९ || रविवार २६ जुलै २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

## वीर धरणातून विसर्गामुळे चंद्रभागेच्या पाणीपातळीत वाढ होणार; प्रशासनाचे वारकरी व नागरिकांना नदीपात्रात न जाण्याचे आवाहन

पंढरपूर, : नीरा नदीच्या पात्रात झालेल्या मुसळधार पावसामुळे आणि वीर धरण भरल्याने धरणातून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरू करण्यात आला आहे. त्यामुळे आज दि. २५ जुलै २०२६ रोजी दुपारी २.०० वाजल्यानंतर पंढरपूर येथील चंद्रभागा नदीच्या पाणीपातळीत वाढ होण्याची शक्यता आहे, अशी माहिती लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण, सोलापूर यांच्या वतीने देण्यात आली आहे. ङ्गङ्गवीर धरण यापूर्वीच पूर्ण क्षमतेने भरले असल्याने अतिरिक्त पाण्याचा साठा करणे शक्य नाही. त्यामुळे धरणातून पाण्याचा विसर्ग वाढवण्यात आला आहे. दि. २२ जुलै २०२६ रोजी ४६०० क्युसेकने सुरू झालेला विसर्ग दि. २४ जुलै २०२६ पासून १५ हजार क्युसेक करण्यात आला असून तो आता २५ हजार क्युसेकपर्यंत वाढवण्यात आला आहे. या पाण्याचा निचरा नीरा नदीमार्गे भीमा नदीत होत असून त्याचा थेट परिणाम चंद्रभागेच्या पातळीवर होणार आहे. ङ्गङ्गया पार्श्वभूमीवर प्रशासनाने पंढरपूर



शहरातील भाविक-वारकरी आणि नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. आज दुपारी २ नंतर पाणीपातळीत सातत्याने वाढ होणार असल्याने कोणत्याही नागरिकाने नदीपात्रात उतरू नये, असे आवाहन अधीक्षक अभियंता, लाभ क्षेत्र विकास प्राधिकरण (पाटबंधारे विभाग) सोलापूर यांनी केले आहे. आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर लाखो वारकरी पंढरपुरात दाखल झाले आहेत. त्यामुळे चंद्रभागा किनारी आणि वाळवंटात विशेष खबरदारी घेण्याच्या सूचना प्रशासनाने दिल्या आहेत.

## उद्योग क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल कविता ढवळे यांचा लोकनेते अजितदादा पवार सन्मान पुरस्कार-२०२६ ने गौरव

छत्रपती संभाजी नगर

सौ. कविता अरुण ढवळे यांना लोकनेते अजितदादा पवार सन्मान पुरस्कार २०२६ ने गौरविण्यात आले. प्रसिद्ध वक्ते, विचारवंत संजय आवटे आणि मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे सरचिटणीस आमदार सतीश चव्हाण साहेब यांच्या हस्ते हा सन्मान करण्यात आला. यावेळी सौ. कविता आणि त्यांचे पती श्री अरुण ढवळे यांचाही यथोचित सन्मान करण्यात आला.

सौ. कविता अरुण ढवळे यांनी २००३ मध्ये पैठणी विणकामाचे प्रशिक्षण घेऊन मराठी पैठणी सेंटर, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ संचलित पैठण येथे पूर्ण केले. त्यांनी २००३ ते २००६ पर्यंत निरनिराळ्या पैठणी डिझाइनच्या पैठण्या जसे की, असावली, अजंठा लोटस, कोयरी मोर, सदाबहार वेलफुल इत्यादी अजिंठा, जंगल ऑल ओव्हर या डिझाईन उत्कृष्ट पैठणीवर विनले. हे सर्व त्यांना पैठणी केंद्राच्या उत्कृष्ट मार्गदर्शनामुळे शक्य झाले. त्यांनी २००७ मध्ये महाराष्ट्र महामंडळा मार्फत तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक श्री. दिनेश वाघमारे यांच्या हस्ते रु-५००० रोख रक्कम, प्रमाणपत्र स्वरुपात उत्कृष्ट व कुशल विनकर म्हणून पारितोषिक पटकावले.

२००७ मध्ये ६० महिलांना पैठणीचे प्रशिक्षण देण्याची प्रशिक्षकाची जबाबदारीही त्यांना मराठी पैठणी केंद्राने त्यांना दिली. ते काम त्यांनी यशस्वीपणे पार पाडले. २०१८ मध्ये त्यांनी ४० महिलांना पैठणी प्रशिक्षण याच केंद्रामार्फत देण्याचे




प्रशिक्षिक म्हणून काम केले. २०१९ मध्ये ६० महिलांना त्यांनी पैठणी प्रशिक्षण दिले. च्या मार्फत हे शिक्षण दिले गेले. २०२४ मध्ये केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री श्री. गिरिराज सिंग यांच्या हस्ते दिल्ली येथे त्यांना प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. उल्लेखनीय म्हणजे २०२५ मध्ये दिल्ली येथे देशाचे प्रधानमंत्री श्री. नरेंद्र मोदी यांनी मन की बात या कार्यक्रमामध्ये त्यांच्या कार्याची नोंद घेत कौतुक केले. २०२५ ला मुंबईमध्ये लोकसंसद जणप्रेरणा शिखर पुरस्कार त्यांना नामांकित मराठी अभिनेत्री अलका कुबल, निशिगंधा वाड यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. २०२६ मध्ये भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त पाहुणे म्हणून राष्ट्रपती भवनकडून त्यांना विशेष आमंत्रित करण्यात आले होते. तसेच मुंबई, दिल्ली, संभाजीनगर यांसह अनेक ठिकाणी प्रदर्शनातही त्यांनी सक्रीय सहभाग घेतला. मागील २५ वर्षात २५ हजारांपासून ते ६ लाख किमतीपर्यंतच्या ३०० पैठणी साड्यांचे विणकाम त्यांनी यशस्वीपणे पूर्ण केले आहे. या पैठणीच्या प्रशिक्षण व विनाकामामुळे त्यांनी आयुष्यात सर्वतोपरी यशस्वी वाटचाल केली असे त्यांचे मत आहे. या कामगिरीमुळे त्या आपल्या मुलाला मर्चन्ट नेव्हीमध्ये ऑफिसर बनविण्याचे शिक्षण देऊ शकल्या. तर मुलीला डॉक्टर बनवण्याचे स्वप्नही त्यांनी उराशी बाळगले आहे. या यशस्वी वाटचालीमध्ये मराठी पैठणी केंद्राच्या कर्मचारी आणि अधिकाऱ्यांचा मोलाचा वाटा आहे, असे त्या कृतज्ञतापूर्वक सांगतात.

## दोन लाख गोविंदांना विमा संरक्षणाची शक्यता; एकनाथ शिंदेंचे तातडीच्या कार्यवाहीचे निर्देश

मुंबई : गोकुळाष्टमी आणि दहीहंडी उत्सवात सहभागी होणाऱ्या गोविंदांच्या सुरक्षेला प्राधान्य देत राज्य सरकारने महत्त्वाचे पाऊल उचलण्याचे संकेत दिले आहेत. राज्यातील सुमारे दोन लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्याच्या मागणीची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गंभीर दखल घेत संबंधित विभागाला तातडीने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.

युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहून राज्यातील सर्व गोविंदांना व्यापक विमा संरक्षण देण्याची मागणी केली होती. गोकुळाष्टमी आणि दहीहंडी हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा अविभाज्य भाग असून, दरवर्षी लाखो गोविंदा जीव धोक्यात घालून या उत्सवात सहभागी होतात. सरावादरम्यान तसेच प्रत्यक्ष दहीहंडी फोडताना अनेकांना गंभीर दुखापती होतात. अनेक मंडळांची आर्थिक परिस्थिती मर्यादित असल्याने उपचारांचा खर्च उचलणे कठीण जाते, त्यामुळे शासनाने विमा संरक्षण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली होती.





यापूर्वी राज्य सरकारच्या माध्यमातून सुमारे एक लाख गोविंदांना विमा संरक्षण देण्यात आले होते. मात्र यंदा हा लाभ वाढवून सुमारे दोन लाख गोविंदांपर्यंत पोहोचवावा आणि ''महाराष्ट्र राज्य दहीहंडी गोविंदा असोसिएशन''च्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी करावी, अशी मागणी सरनाईक यांनी केली होती. या मागणीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पत्रावर ''याप्रकरणी योग्य ती कार्यवाही करावी'' अशी स्पष्ट नोंद करत संबंधित यंत्रणेला तातडीने आवश्यक पावले उचलण्याचे निर्देश दिले.

याबाबत प्रतिक्रिया देताना पूर्वेश प्रताप सरनाईक यांनी उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले. गोविंदांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत, राज्य सरकारच्या सकारात्मक भूमिकेमुळे लाखो गोविंदांना मोठा दिलासा मिळेल आणि यंदाचा गोकुळाष्टमी व दहीहंडी उत्सव अधिक सुरक्षित वातावरणात साजरा होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

मुंबई, ठाणे, पुणे, नवी मुंबई, पालघर आणि राज्यातील अनेक शहरांमध्ये दहीहंडी उत्सव मोठ्या प्रमाणावर आयोजित केला जातो. अनेक सामाजिक संस्था, मंडळे आणि राजकीय संघटना या स्पर्धांचे आयोजन करतात. विजेत्या गोविंदा पथकांना लाखो रुपयांची बक्षिसे दिली जातात.

## अन्नधान्याची काळ्या बाजारात विक्री करणाऱ्यांवर बार्शी तालुका पोलीस स्टेशनची धडक कारवाई; तब्बल ₹८,९८,२३० किमतीचा मुद्देमाल जप्त

बार्शी–

बार्शी तालुका पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सपोनि अक्षय सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या विशेष मोहिमेत आणखी एक मोठी कारवाई करण्यात आली आहे. गोरगरिबांना सार्वजनिक वितरण प्रणाली (रेशन) अंतर्गत मोफत मिळणाऱ्या तांदळाची काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करणाऱ्या आरोपींवर पोलिसांनी धडक कारवाई करत ₹८,९८,२३० किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.ङ्ग गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी सापळा रचून बार्शी सोलापूर रोडवरील सौंदरे गावच्या जवळ एम.एच. १३ डी.क्यू. ६१८४ क्रमांकाचा महिंद्रा मॅक्स पिकअप अडवून तपासणी केली. वाहनामध्ये विविध रंगांच्या प्लास्टिकच्या कट्ट्यांमध्ये भरलेला ४६९० किलो तांदूळ आढळून आला. सदर तांदूळ सार्वजनिक वितरण प्रणालीतील असल्याचा संशय आल्याने वाहन व तांदूळ ताब्यात घेण्यात आला.ङ्गसदर पिकअप वाहन व त्यामधील तांदळाची तपासणी व खातरजमा करण्यासाठी तो पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, बार्शी यांच्याकडे पाठविण्यात आला. त्यांनी सादर केलेल्या अहवालामध्ये सदर तांदूळ हा सार्वजनिक वितरण प्रणालीतील (रेशन) असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर पुरवठा निरीक्षक, तहसील कार्यालय, बार्शी यांच्या फिर्यादीवरून संबंधित आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ८० ठिक्यात ४६९० किलो तांदूळ व महिंद्रा मॅक्स पिकअप असा एकूण ₹८,९८,२३० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.ङ्गयाप्रकरणी दिगंबर उर्फ आमरुषी उर्फ आप्पा संभाजी सुरवसे व विवेक उर्फ भगवान संभाजी सुरवसे (दोघे रा. बार्शी), अक्षय राजाभाऊ बारसकर (रा. दत्तनगर, वैराग), यांच्याविरुद्ध शासकीय अन्नधान्याचा अपहार करून काळ्या बाजारात विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक केल्याप्रकरणी संबंधित कायद्यांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सपोनि अक्षय सोनवणे हे करीत आहेत.

सदरची कारवाई अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण, विजय कबाडे, अप्पर पोलीस अधीक्षक, सोलापूर ग्रामीण तसेच सुहास जगताप, उपविभागीय पोलीस अधिकारी, बार्शी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. सपोनि अक्षय सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली पोलीस अंमलदार युवराज गायकवाड, सिद्धेश्वर लोंढे, अमृत खेडकर व लक्ष्मण चित्तलवाड यांनी ही धडक कारवाई यशस्वीरित्या पार पाडली.

बार्शी तालुका पोलीस स्टेशनकडून अवैध धंदे, काळाबाजार व समाजविघातक कृत्यांविरोधातील अशा धडक कारवाया यापुढेही अधिक प्रभावीपणे सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

## कुंभेफळ येथे जिल्हा परिषद शाळेत ‘बाल दिंडी’ व ‘जागतिक योग दिन’ उत्साहात संपन्नकुं

परंडा (प्रतिनिधी)

: कूभेफळ ता परडा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत आषाढी एकादशी व जागतिक योग दिनाचे




औचित्य साधून भव्य ‘बाल दिंडी’ आणि योग साधना कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामस्थ, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या शिस्तबद्ध व उत्स्फूर्त उपस्थितीमुळे हा सोहळा अत्यंत उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडला.भक्तिमय वातावरणात निघाली बाल दिंडीशाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांनी वारकऱ्यांचा पारंपरिक पोशाख परिधान करून हाती टाळ-मृदंग आणि पताका घेत बाल दिंडी काढली. या दिंडीमध्ये गावातील भजनी मंडळ, सर्व ग्रामस्थ, पालक, विद्यार्थी आणि शिक्षक वृंद मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. दिंडी दरम्यान साऊंड सिस्टीमवर लावण्यात आलेल्या विविध भक्ती गीतांनी आणि अभंगांनी संपूर्ण गाव विठ्ठलनामाच्या गजराने दुमदुमून गेले होते. गावातील तरुण मंडळाच्या वतीने दिंडीत सहभागी झालेल्या सर्व वारकऱ्यांसाठी उत्कृष्ट नाश्त्याची सोय करण्यात आली होती.विद्यार्थ्यांनी केली योगासनेदिंडी सोहळ्यानंतर शाळेच्या प्रांगणात सामूहिक योग साधनेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थ्यांनी विविध योगासने आणि प्राणायामचे प्रात्यक्षिक केले. निरोगी आरोग्यासाठी योगाचे महत्त्व शिक्षकांनी यावेळी पटवून दिले.मान्यवरांची उपस्थितीया प्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. पाटील एच. एस., पदवीधर शिक्षक श्री. केमदारने एम. बी. श्रीमती यादव व्ही. एच. श्री. इनामदार एम. जी., श्रीमती कुलकर्णी व्हि. डी. आणि श्रीमती खंबायत एस. बी. यांनी स्वतः उपस्थित राहून विद्यार्थ्यांसोबत योगासने करत त्यांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक, पालकांनी आणि ग्रामस्थांनी विशेष परिश्रम घेतले . दिंडी बघन्यासाठी गावातिल लाहान थोर मडळी उपस्तित होते .

सूर्योदय

रविवार २६ जुलै २०२६

संपादकीय

## चलनाचा बदलता चेहरा

मानवी संस्कृतीच्या विकासासोबतच चलनाचे स्वरूपही सातत्याने बदलत गेले. वस्तूविनिमय पद्धतीपासून सुरू झालेला हा प्रवास धातूची नाणी, कागदी नोटा, आणि आजच्या डिजिटल युगात 'प्लास्टिक मनी' (क्रेडिट/ डेबिट कार्डस) आणि 'डिजिटल चलना'पर्यंत येऊन पोहोचला आहे; मात्र या सगळ्या प्रवासात प्रत्यक्ष हाताळल्या जाणाऱ्या चलनी नोटांचे महत्त्व आजही कमी झालेले नाही. गेल्या काही वर्षांमध्ये जागतिक स्तरावर आणि भारतातही एका नव्या तंत्रज्ञानाची जोरदार चर्चा सुरू आहे, ती म्हणजे पॉलिमर म्हणजेच प्लास्टिक नोटा. कागदी नोटांना पर्याय म्हणून प्लास्टिक नोटा आणणे, हा जागतिक अर्थव्यवस्थेतील एक महत्त्वाचा प्रयोग मानला जात आहे. सध्या आपण वापरत असलेल्या चलनी नोटा शंभर टक्के कागदाच्या नसतात, तर त्यात कापूस आणि अंबाडी यांच्या धाग्यांचे मिश्रण असते. असे असले तरी, या नोटांची एक ठरावीक मर्यादा असते. त्या लवकर फाटतात, पाण्यात भिजल्यास खराब होतात आणि सततच्या हाताळणीमुळे मळतात. एका अंदाजानुसार, भारतात दरवर्षी अब्जावधी रुपयांच्या मळकट आणि फाटलेल्या नोटा चलनातून बाद कराव्या लागतात आणि त्यांच्या जागी नव्या नोटा छापाव्या लागतात.

हा दर वर्षी होणारा एक मोठा आर्थिक भुर्दंड आहे. या समस्येवर मात करण्यासाठी १९८८ मध्ये ऑस्ट्रेलियाने जगात सर्वप्रथम 'पॉलिमर' (एक प्रकारचे प्लास्टिक) नोटा चलनात आणल्या. त्यानंतर कॅनडा, ब्रिटन, न्यूझीलंड, रोमानिया आणि व्हिएतनाम यांसारख्या ३० पेक्षा अधिक देशांनी प्लास्टिक नोटांचा पूर्णपणे किंवा अंशतः स्वीकार केला. हा जगभरातील ट्रेंड पाहता, भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि अफाट चलन हाताळणी असलेल्या देशात प्लास्टिक नोटांचा पर्याय कितपत योग्य ठरेल, याचे विश्लेषण करणे आवश्यक आहे. प्लास्टिक नोटांचे समर्थक आणि मध्यवर्ती बँका यांचा या तंत्रज्ञानाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अत्यंत स्पष्ट आणि व्यावसायिक आहे. प्लास्टिक नोटांवर कागदी नोटांपेक्षा अधिक प्रगत सुरक्षा वैशिष्ट्ये वापरता येतात, त्यामुळे बनावट नोटा तयार करणे कठीण होते. भारतासारख्या देशासाठी त्या आर्थिक सुरक्षेचे प्रभावी साधन ठरू शकतात. त्यांचे आयुष्य कागदी नोटांपेक्षा चार ते पाचपट जास्त असते. त्या सहज फाटत नाहीत, खराब होत नाहीत आणि उष्ण-दमट हवामानातही टिकाऊ राहतात. तसेच पॉलिमर नोटा सहज स्वच्छ करता येत असल्याने सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीनेही त्या अधिक उपयुक्त मानल्या जातात. प्लास्टिक नोटा कागदी नोटांपेक्षा अधिक टिकाऊ आणि पर्यावरणपूरक ठरू शकतात. त्या खराब झाल्यावर पुनर्वापर करून प्लास्टिकच्या वस्तू बनवता येतात. तसेच, त्यांचे दीर्घआयुष्य असल्याने नव्या नोटांची छपाई, कागदाचा वापर आणि वृक्षतोड कमी होते.

मात्र, पॉलिमर नोटांच्या वापरात आर्थिक, तांत्रिक आणि पर्यावरणीय अडचणी असल्याने त्यांचा खर्च अनावश्यक वाटू शकतो. प्लास्टिक नोटांच्या छपाईचा सुरुवातीचा खर्च कागदी नोटांच्या तुलनेत अत्यंत जास्त असतो. पॉलिमर फिल्मची आयात, विशेष शाई आणि प्रगत छपाई यंत्रसामग्री यासाठी अब्जावधी रुपयांची गुंतवणूक करावी लागेल. भारतासारख्या विकसनशील देशासाठी,

जिथे आधीच वित्तीय तूट आणि इतर सामाजिक क्षेत्रांवर खर्च करण्याचे आव्हान आहे, तिथे केवळ नोटा बदलण्यासाठी एवढा मोठा खर्च करणे कितपत व्यवहार्य आहे, हा मोठा प्रश्न आहे. हा खर्च केवळ नोटा छपाईपुरता मर्यादित नाही. देशातील लाखो एटीएम मशिन्स, बँकांचे कॅश काउंटिंग मशिन्स आणि व्हेंडिंग मशिन्स हे कागदी नोटांच्या जाडीनुसार आणि वजनानुसार डिझाइन केलेले आहेत. प्लास्टिक नोटा आल्यास देशभरातील सर्व एटीएम मशिन्सचे 'कॅलिब्रेशन' बदलावे लागेल. नोटाबंदीच्या काळात (२०१६) एटीएम बदलताना झालेला खर्च आणि गोंधळ देशाने अनुभवला आहे. हा पुन्हा एकदा बँकिंग यंत्रणेवर आलेला अतिरिक्त ताण असेल. प्लास्टिक नोटा दिसायला आकर्षक असल्या तरी त्यांचा वापर करताना काही अडचणी येऊ शकतात. त्या घसरड्या असल्याने मोजताना किंवा हाताळताना पडण्याची शक्यता असते. तसेच घडी पडल्यास त्या पूर्ववत करणे कठीण होते, जे भारतीयांच्या नोटा खिशात किंवा पाकिटात ठेवण्याच्या सवयीशी विसंगत आहे. भारत डिजिटल पेमेंटकडे वेगाने वाटचाल करत असून क्यूआर कोड, ई-रूपी आणि इतर डिजिटल माध्यमांचा वापर वाढत आहे. अशा परिस्थितीत प्लास्टिक नोटांसाठी मोठा खर्च करणे कितपत योग्य आहे, हा प्रश्न निर्माण होतो. भारतातील चलनाचा वेग आणि वापराचे प्रमाण इतर देशांपेक्षा वेगळे असल्याने प्लास्टिक नोटांचा निर्णय विचारपूर्वक घेणे गरजेचे आहे.

रिझर्व्ह बँकेने मागे जयपूर, शिमला, भुवनेश्वर, म्हैसूर आणि कोची या पाच शहरांमध्ये हवामानातील विविधतेचा अंदाज घेण्यासाठी दहा रुपयांच्या प्लास्टिक नोटांची चाचणी घेण्याचे ठरवले होते. या चाचण्यांचे निष्कर्ष संमिश्र राहिले. भारताच्या अत्यंत उष्ण हवामानात प्लास्टिक नोटा वितळणार किंवा कडक होणार नाहीत ना, याची खात्री करणे गरजेचे आहे. प्लास्टिक नोटांच्या दोन्ही बाजू पाहिल्यानंतर, ही व्यवस्था संपूर्ण सुरक्षित किंवा पूर्णपणे अनावश्यक अशा

# डॉ.बी.ए.हायस्कूल मंडणगड येथे भक्तिमय दिंडी-पालखी सोहळा उत्साहात साजरा

आषाढी एकादशी निमित्त मंडणगड तालुका विकास मंडळ संचलित,डॉ.बी.ए. हायस्कूल मंडणगड येथे भक्तिमय दिंडी-पालखी सोहळा उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्याध्यापक अर्जुन हुल्लोळी होते. त्यांनी आपल्या गोड भक्तीमय वाणीतून विद्यार्थ्यांचे कौतुक केले.व शुभेच्छा दिल्या.पर्यवेक्षक शांताराम बैकर यांनी आपल्या गोड वाणीतून विठ्ठलाचा गजर सादर केला,सांस्कृतिक विभाग प्रमुख बजरंग गावडे यांनी विशेष मेहनत घेतली व शिक्षक नरेश माटवणक,सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले.ङ्गविठ्ठल-रुक्मिणीच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी तसेच पांढरे कुडते परिधान केलेल्या मुलांनी आणि नऊवारी साडीतील मुलींनी दिंडीची शोभा वाढवली. या पालखी सोहळयामध्ये विद्यार्थ्यांनी स्वतः गाणी रचून व बोलून वारकरी नृत्य सादर केली. शाळा भक्तिमय वातावरणात रंगून गेली.वारकरी दिंडी मंडणगड एसटी स्थानकातून विविध वारकरी नृत्य सादर करून, मार्गक्रमण करून पुन्हा शाळेत दाखल झाली.ङ्गयावेळी मंडणगड केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्र रेवाळे, पत्रकार बंधू,शिक्षक प्रतिनिधी,शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी, व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.उपस्थित सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



# पनवेलमध्ये वंचित बहुजन आघाडीच्या मोर्च्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

पनवेल प्रतिनिधी

सुनील जाधव

नवी मुंबई,वंचित बहुजन आघाडीने केंद्र सरकारच्या निषेधार्थ दिलेल्या आंदोलनाच्या हाकेला उत्स्फूर्त देत शेतकरी कामगार पक्ष,उबाठा पक्ष,महाराष्ट्र नवनिर्माण सेना,काँग्रेस पक्षाचे पदाधिकारी व असंख्य कार्यकर्ते सहभागी झाले होते.पावसाची पर्वा न करता विद्यार्थी व विद्यार्थ्यांचे पालकवर्ग,महिला आणि राजकीय सर्व पक्षीय पदाधिकारी व कार्यकर्ते आज छत्रपती शिवाजी महाराज चौक या ठिकाणी एकत्र येवुन जोरदार आंदोलन करण्यात आले.विद्यार्थ्यांवर लाठी हल्ला नव्हे तर न्याय द्या,विद्यार्थी आंतकवादी नाही तर ते देशाचे भवितव्य आहे.संविधान वाचवा अश्या प्रकारच्या घोषणांनी परिसर दणाणुन गेला होता.या आंदोलनामध्ये वंचित आघाडी पनवेलचे अध्यक्ष आंनद गायकवाड,शेकापचे बाळाराम पाटील,सचिन कांबळे,राजेंद्र सदावर्ते,पंचशिल शिरसाठ,सुभाष गायकवाड,सचिन तांबे,महेश सांळुखे,सुदाम पाटील,काँग्रेसचे योगेश चिले,मनसे अध्यक्ष सागर जाधव,विविध सामाजिक संस्थेचे सुनिता जाधव,ज्योती क्षिरसागर,सुमीता कोतवाल,युवा पदाधिकारी धम्मेश जाधव,विनोद कोतवाल,प्रसाद राणे,गणेश जाधव,इ.पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# माणगांव तालुक्यात यांत्रिक भात लागवडीचा यशस्वी प्रयोग- शेतकऱ्यांसाठी नवा मार्ग

!! इंदापूर प्रतिनिधी!!

गौतम प्रकाश साळवी

शेतातील मजुरांची अडचण आणि वाढता खर्च यावर तोडगा काढण्यासाठी माणगाव तालुका कृषी विभागाने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे.

दिनांक २४ जुलै २०२६ रोजी मोजे कोशिंबळे तर्फे तळे आणि भुवन या दोन्ही गावांमध्ये यांत्रिक पद्धतीने भात लावणीचे प्रात्यक्षिक मोठ्या उत्साहात पार पडले.

१. कार्यक्रमाचा उद्देश आणि व्याप्ती

तालुका कृषी अधिकारी

श्री किरण पडवळकर यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा अंतर्गत या खरीप हंगामात माणगाव तालुक्यातील ९३ एकर क्षेत्रावर यांत्रिक पद्धतीने भात लागवड करण्याच्या नियोजन आहे.

शेतकऱ्यांसाठी संदेश: लहान क्षेत्रापासून सुरुवात करून तुम्हीही या ९३ एकरच्या योजनेत सहभागी होऊ शकता. गटाने अर्ज केल्यास अवजारे मिळवणे सोपे होते.

२. प्रात्यक्षिकातील ३ मोठे उपक्रम आणि त्यांचे फायदे

अ. यांत्रिक पद्धतीने भात लावणी + मॅट नर्सरी

ट्रान्सप्लाटर मशीनद्वारे भाताची पुनलागवड कशी होते हे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष दाखवण्यात आले. त्यासाठी गादीवाश्यावर मॅट नर्सरी तयार करण्याची पद्धत शिकवली.

ही मशीन तालुक्यातील प्रगतशील शेतकरी श्री दाऊद गालसुरकर यांनी उपलब्ध करून दिली.

का महत्वाचे :

. १ एकर लावणीसाठी





लागणारा वेळ ५०% ने कमी होतो

.मजुरांवर अवलंबून राहावे लागत नाही.

.रोपांची वाढ एकसारखी होते त्यामुळे उत्पन्नात वाढ होत.

शेतकऱ्यांसाठी संदेश: महाडीबीटी पोर्टलवर शेतकरी गटाने अवजारे बँकेसाठी अर्ज करा.एकट्याला मशीन परवडत नसेल तर पाच ते दहा शेतकऱ्यांनी मिळून घ्या.

उपस्थिती

या कार्यक्रमाला आत्मा अलिबागच्या श्रीमती चौधरी मॅडम तंत्र अधिकारी

रवीशंकर कावळे,मकअ संजय ससाने एटीएम चे प्रमोद शिंदे,प्रगती बांगर तसेच

श्रीमती मनीषा मालोरे उपसभापती पंचायत समिति माणगाव.

मंजुरा अभावी भातशेतीचे क्षेत्र कमी होत आहे यावर उपाय म्हणजे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन कृषी अवजारांचा वापर वाढवणे.

पंचायत समितीचे सदस्या संगीता भक्कम जिल्हा परिषद सदस्या दिशा जाधव, यांच्यासह विजय बक्कम महीपत मांजरे,वसंत साठे, विठोबा दळवी यासारखे प्रगतशील शेतकरी आणि मोठ्या संख्येने महिला शेतकरी उपस्थित होत्या.

शेवटी शेतकऱ्यांसाठी ३

कृतीचे मुद्दे:

गट तयार करा :५ ते २० शेतकऱ्यांचा गट करून महाडीबीटीवर अवजार बँक, ट्रान्सप्लाटर बनठी अर्ज करा.

खर्च कमी करा:

गोकृपामूतम घरी बनवा आणि रासायनिक खत ३०% ने कमी करा.

उत्पन्न वाढवा:

बांधावर तूर, मूग सारखी पिके घ्या एकाच जमिनीतून दोन उत्पन्न.

# मैत्री ग्रुप यांच्या वतीने केलटे शाळेला गोदरेज कपाट भेट

म्हसळा प्रतिनिधी

मुकुंद बोर्ले

गुरुवर्य नारायण पांडूरंग गोरे यांच्या ४ थे पुण्य स्मरणार्थ नेवरूळ गावचे समाज सेवक नंदकुमार महाडीक यांच्या संकल्पनेतून म्हसळा तालुक्यातील विविध शाळेमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. बेणसे , सांगवड, ठाकरोळी, कोकबल, घूम , रुंद्रवट, या शाळेतील सर्व विद्यार्थांना छत्री वाटप करण्यात आले. तसेच डॉक्टर तन्वी शर्मिला रमेश काते यांच्याकडून आजी कै. रुक्मीनी विठोबा काते यांच्या पुण्य स्मरणार्थ नेवरूळ शाळा , अंगणवाडी, तसेच केलटे शाळा या जिल्हा परिषदेच्या शाळेना गोदरेज कपाट वाटप करण्यात आले. या स्तुत्य उपक्रमाबद्धळ मैत्री ग्रुपचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे.

गुरुवर्य नारायण गोरे यांच्या पुण्य स्मरणार्थ मैत्री ग्रुप कडून सलग चार वर्ष असे उपक्रमशीर कार्यक्रम आयोजित करण्यात येतात त्याबद्धळ माजी सभापती रविंद्र लाड यांनी सर्व सदस्याचे मनापासून आभार मानले, सदर कार्यक्रमाला विजय लटके , दत्ताशेठ लटके, सुनिल दिवेकर, गणपतराव सावंत, नंदकुमार महाडीक, पांडूरंग खेडेकर, राजेंद्र मिरगळ, भरतभाई भट्टीकर, मधुकर काते, रमेश काते,निलेश माळवदे, श्रीधर काते, विनायक रिकामे, रामजी काते, सुहासदादा महागांवकर, मदनशेठ यादव इत्यादी प्रतिष्ठीत मंडळी उपस्थीत होते .





# महाराष्ट्र प्री अपर प्रायमरी शिष्यवृत्ती परीक्षेत एसीबी इंटरनेशनल स्कूल, कापसाळची विद्यार्थिनी चमकली

## तालुक्यात प्रथम, जिल्ह्यात १६ वा क्रमांक; शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा शिक्कामोर्तब

चिपळूण :- महाराष्ट्र शासनातर्फे फेब्रुवारी २०२६ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवीच्या प्री अपर प्रायमरी शिष्यवृत्ती परीक्षेत एसीबी इंटरनेशनल स्कूल, कापसाळच्या विद्यार्थिनीने उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.ङ्गसीबीएसई अभ्यासक्रमातून परीक्षेला बसलेल्या कु. सौम्य बिपिन दाभोळकर हिने तालुक्यात प्रथम व जिल्ह्यात १६ वा क्रमांक मिळवत गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. तिच्या या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.या यशस्वी विद्यार्थिनीचे, तिच्या पालकांचे तसेच तिला मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे शाळेचे मुख्याध्यापक, स्कूल मॅनेजमेंट व सर्व शिक्षकांनी मनःपूर्वक अभिनंदन केले. भविष्यातही विद्यार्थिनीने शैक्षणिक क्षेत्रात अशीच उज्ज्वल कामगिरी करून शाळेचे व पालकांचे नाव उंचावावे, अशा शुभेच्छाही यावेळी देण्यात आल्या.या यशामुळे एसीबी इंटरनेशनल स्कूल, कापसाळच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली असून परिसरातून शाळेवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



# चिंचघर प्रभूवाडी शाळेत शिक्षण परिषद उत्साहात संपन्न

आज शुक्रवार दिनांक २४ जुलै २०२६ रोजी चिंचघर दस्तुरी केंद्राची माहे जुलै महिन्याची केंद्रस्तरीय शिक्षण परिषद जिल्हा परिषद पूर्ण प्राथमिक आदर्श शाळा चिंचघर प्रभूवाडी शाळेत उत्साह पूर्ण वातावरणात संपन्न झाली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन व प्रतिमापूजनाने झाली. त्यानंतर शाळेतील विद्यार्थ्यांनी ईशस्तवन व स्वागत पद्य सादर केले. शाळेचे मुख्याध्यापक श्री नरेश ठोंबरे यांनी उपस्थित मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत केले. केंद्रप्रमुख श्री प्रभाकर कोळेकर यांनी प्रास्ताविक केले. या शिक्षण परिषदेला अडव्होकेट मा. श्री. दिलीप चव्हाण यांनी मिशन अभय अंतर्गत विद्यार्थी सुरक्षा, महिलांची सुरक्षा आणि पोस्को कायद्यावर सखोल मार्गदर्शन करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर आनापान आपण विपश्यना यावर श्रीमती क्षितिजा तावरे, शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठन या विषयावर श्रीमती अर्चना शिरसाट, अध्ययन निष्पत्ती वर आधारित मार्गदर्शन श्रीमती मनीषा खिळे यांनी केले. समाज सहभाग यावर सौ सविता सुतार यांनी उत्तम प्रकारे मार्गदर्शन केले.श्री. अनिल पार्टे सर यांनी करियर मार्गदर्शन केले.ङ्ग मध्यंतरानंतर केंद्रप्रमुख श्री प्रभाकर कोळेकर यांनी देवाण-घेवाण समस्या निराकरण, निपुण अभियानांतर्गत विषयनिहाय सर्व शाळांचा आढावा घेऊन प्रशासकीय मार्गदर्शन केले व केंद्र संसाधन समूह ( )बद्दलची माहिती देऊन नवीन केंद्र संसाधन समूह स्थापन केला ङ्ग या शिक्षण परिषदेला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री उदय गुहागरकर, उपाध्यक्षा सौ. प्रिया गुहागरकर, स्थानिक प्राधिकरण सदस्य श्री. सखाराम जाधव, माजी सरपंच सांगली मॅडम, निवृत्त केंद्र प्रमुख अशोक साळुंखे, शिक्षणप्रेमी सांगले सर, सर्व सदस्य आणि ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते.ङ्गशिक्षण परिषद यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक नरेश ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली पदवीधर शिक्षक विनोद जाधव, उपशिक्षक सतीश गजमल, सूर्यकांत बेंद्रे यांनी विशेष मेहनत घेतली.ङ्गसूत्रसंचालन विनोद जाधव तर आभार मुख्याध्यापक नरेश ठोंबरे यांनी मानले.



# जंतर मंतर येथील विद्यार्थ्यांवरील लाठीहल्ल्याचा पालीत तीव्र निषेध

## छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ सुधागड वासीयांचे शांततापूर्ण आंदोलन

रा. जि. उ. उपसंपादक /मंगेश यादव :दिल्लीतील जंतर मंतर येथे न्याय्य हक्कासाठी आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीहल्ल्याचे तीव्र पडसाद रायगड जिल्ह्यातील पाली-सुधागडमध्ये उमटले आहेत.

या घटनेच्या निषेधार्थ बुधवारी (ता.२२) सायंकाळी पाली येथील छत्रपती शिवाजी महाराज स्मारकाजवळ संपूर्ण सुधागडवासीय एकवटले. विशेष म्हणजे या आंदोलनात पुरुषांसोबतच महिला, तरुण आणि लहानग्यांनीही हातात फलक धरून उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

आंदोलनाचे मुख्य आकर्षण म्हणजे लहान मुलांपासून ते महिलांपर्यंत सर्वांनीच घेतलेला सक्रिय पुढाकार. ''जोपर्यंत न्याय नाही, तोपर्यंत लढा थांबणार नाही!'', ''आवाज दाबला तरी उठणारच!'' आणि ''मेहनत आमची, निकाल तुमचा - चालणार नाही!'' अशा आशयाचे संदेश लिहिलेले फलक नागरिक तसेच चिमुकल्यांच्या व तरुणांच्या हातात दिसून आले. यावेळी उपस्थित सर्व आंदोलनकर्त्यांनी सनदशीर व शांततापूर्ण मार्गाने, पोलीस प्रशासनाच्या सहकार्याने आणि कायद्याच्या चौकटीत राहून आपला निषेध नोंदवला.

हातात तिरंगा आणि सोनम वांगचूक तसेच राष्ट्रपुरुषांच्या प्रतिमा घेऊन उपस्थितांनी विद्यार्थ्यांच्या लढ्याला भक्कम पाठिंबा दर्शवला. यावेळी अनेकांनी तीव्र शब्दांत आपल्या भावना व्यक्त केल्या. पालीतील जनतेने दाखवलेल्या या अभूतपूर्व एकजुटीमुळे आणि लहान मुलांच्याही संवेदनशील सहभागामुळे हे आंदोलन संपूर्ण तालुक्यात चर्चेचा विषय ठरले आहे.



# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

विकसित भारत रोजगार हमी कि केवळ स्वप्न?

ग्रामीण भागातील आदिवासी बहुल भागातील मजुरांना पावसाळ्यात शेतात पेरणी आणि लावणी झाल्यानंतर हाताला काम नसते.त्यासाठीच १९७२ नंतर ग्रामीण भागातील दुष्काळामुळे होणारी उपासमार आणि स्थलांतर रोखण्यासाठी कामासाठी अन्न योजना सरकारने सुरु केली होती. जी मनरेगा नावाने प्रचलित होती.आता केंद्रातील भाजप सरकारने याच योजनेचे नाव बदलून विकसित भारत रोजगार हमी योजना केलेले आहे.अर्थात या योजनेत काही बदल देखील केले गेले आहेत. परंतु सरकारची हि योजना ग्रामीण मजुरांच्या हाताला योग्य ते काम देणारी आणि पर्यायाने रोजगार उपलब्ध करून देणारी आहे कि केवळ दिवास्वप्न दाखविणारी आहे?या प्रश्नाचा धांडोळा घेण्यासाठीच श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

११९७२ साली सरकारने जी मनरेगा योजना सुरु केली होती ती योजना आणि तिचा उद्देश काय होता?

रोजगाराची हमी हि महाराष्ट्रासाठी नवी योजना नाही. ग्रामीण रोजगारात कायदेशीर संरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील पथदर्शक राज्य आहे. १९७२ च्या भीषण दुष्काळानंतर ग्रामीण भागातील उपासमार आणि स्थलांतर रोखण्यासाठी कामासाठी अन्न हि योजना सुरु झाली. यावर कायमस्वरूपी मार्ग काढण्यासाठी महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम १९७७ अस्तितवात आला. आणि लागू झाला. वि.स. पागे हे या योजनेचे शिल्पकार होते. मागेल त्याला काम हा या कायद्याचा आत्मा होता. महाराष्ट्राचा हा प्रयोग देशासाठी आदर्श ठरला. आणि २००५ साली या योजनेचे नामकरण मनरेगा झाले.

२ केंद्र सरकारची नवी विकसित भारत रोजगार हमी योजना नेमकी काय आहे?

एक तर या योजेनचे मनरेगा हे नाव बदलून आता विकसित भारत रोजगार हमी योजना करण्यात आले आहे. नव्या कायद्यात रोजगाराची हमी १०० दिवसावरून १२५ दिवस करण्यात आले आहे. मात्र हे प्रत्येक मजुराला नसून प्रत्येक स्वतंत्र कुटुंबाला आहे. मजुरांनी केलेली कामाची मागणी अनेकदा प्रशासनाकडून नोंदवले जात नाही . त्यामुळे प्रत्येक मागणीची लेखी नोंद आणि डिजिटल नोंद असणे बंधनकारक आहे. १५ दिवसात काम देण्याची तरतूद प्रत्यक्षात उतरली नाही तर १२५ दिवसांचा आकडा हा केवळ कागदावरच राहील. भ्रष्टाचार रोखण्यासाठी नव्या कायद्यात तांत्रिक बदल केले गेले आहेत मात्र त्यामुळे रोजगार थांबता काम नये

३ नव्या योजनेतील हंगामी विराम हि संकल्पना नेमकी काय आहे?

नव्या कायद्यातील हंगामी विराम हि संकल्पना अत्यंत चिंताजनक आहे. शेतीच्या हंगामात रोजगार हमीची कामे ६० दिवस बंद ठेवण्याची तरतूद यामध्ये आहे. जेणेकरून मजुरांनी शेतीकडे वळावे. परंतु शेतीचा हंगाम म्हणजे सलग दोन महिने काम नसते. पेरणी आणि लावणी नंतर मजुरांच्या हाताला अनेक महिने काम नसते .याच काळात घरातील जुने धान्य संपलेले असते आणि नवीन धान्य हाती आलेले नसते त्यामुळे कर्जबाजारेपणा वाढतो.मग या मजुरांच्या भुकेचा काय? अशासाठी एक सकारात्मक तरतूद म्हणजे वन हक्क कायदयानुसार जमीन मिळालेल्या आदिवासी कुटुंबांनी स्वतःच्या शेतातच रोजगार हमी मिळायला हवा.




२नोंद


तैवान एक्सलन्सकडून ऑटोमेशन एक्स्पो २०२६ मध्ये अ‍ॅडॅप्टिव्ह सोल्यूशन्सचे सादरीकरण

भारत स्मार्ट उत्पादन (स्मार्ट मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्रात वेगाने प्रगती करत असताना, तैवान तंत्रज्ञान भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक बळकट करत आहे. याच पार्श्वभूमीवर ऑटोमेशन एक्स्पो २०२६ मध्ये तैवान एक्सलन्स तैवानच्या अर्थमंत्रालयाचा उपक्रम भारतातील उत्पादन क्षेत्राच्या पुढील टप्प्यातील वाढीस चालना देण्यासाठी एआय-आधारित औद्योगिक उपाययोजना सादर करत आहे.मुंबईतील तैपेई इकॉनॉमिक अँड कल्चरल सेंटरचे महासंचालक श्री. होमर चँग यांच्या हस्ते तैवान एक्सलन्स पॅव्हेलियनचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी विविध आघाडीच्या उद्योग संघटना, उत्पादन क्षेत्रातील कंपन्या आणि तंत्रज्ञान भागीदारांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या पॅव्हेलियनमध्ये २२ पुरस्कारप्राप्त तैवानी ब्रँड्स सहभागी असून एआय एज कॉम्प्युटिंग, रोबोटिक्स आणि स्मार्ट ऑटोमेशन तसेच औद्योगिक उपकरणे व घटक या क्षेत्रांतील ५५ हून अधिक अत्याधुनिक नवकल्पनांचे प्रदर्शन करण्यात आले आहे.उद्घाटन दिनाचे प्रमुख आकर्षण ठरलेल्या ''बिल्डिंग सस्टेनेबल मॅन्युफॅक्चरिंग विथ तैवान्स अ‍ॅडॅप्टिव्ह सोल्यूशन्स'' या विषयावरील तैवान एक्सलन्स प्रॉडक्ट लॉन्च कार्यक्रमात , , आणि यांनी आपली नवीन औद्योगिक उत्पादने सादर केली. या उपाययोजनांमधून कृत्रिम बुद्धिमत्ता आणि ऑटोमेशनचा वापर करून उत्पादनक्षमता वाढवणे, मशीन डाऊनटाइम कमी करणे आणि अधिक बुद्धिमान (इंटेलिजंट) कारखाना व्यवस्थापन शक्य कसे होते, याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.

३चला पर्यटनाला

बुलढाण्यातील लोणार सरोवर

बुलढाणा जिल्हा हा महाराष्ट्रातील अमरावती विभागामध्ये येतो.या जिल्ह्यामध्ये १३ तालुके आहेत. श्री संत गजानन महाराज यांच्या पद स्पर्शाने पावन झालेली शेगाव नगरी बुलढाणा जिल्ह्यातच आहे.राजमाता जिजाऊंचा जिथे जन्म झाला तो राजवाडा भव्य असून मुंबई नागपूर हायवे ला लागून आहे..तसेच बुलढाणा जिल्ह्यामध्ये अनेक धार्मिक, नैसर्गिक, ऐतिहासिक पर्यटन स्थळे व अभयारन्ये आहेत. संपूर्ण जगात नाव मिळवलेले लोणार सरोवर हे बुलढाण्यातील खाऱ्या पाण्याचे एक प्रमुख अविश्वासनीय पर्यटन स्थळ आहे. बुलढाणा जिल्ह्यातील लोणार हे सरोवर खाऱ्या पाण्याचे असून त्याची निर्मिती फार वर्षांपूर्वी उल्कापातामुळे झाली होती. सरोवराचे पाणी अल्कधर्मी आहे. बेसोल्ट खडकातील लोणार हे मोठे आघाती विवर आहे. या सरोवरच्या संवर्धनासाठी याला वन्यजीव अभयारण्य म्हणून घोषित केले आहे. या परिसरामध्ये साधारणता बाराशे वर्षांपूर्वीची मंदिरे आहेत.या विवरामध्ये १५ मंदिरे असून लोणार सरोवराची निर्मिती ५२ ते ६० हजार वर्षांपूर्वी झाली असावी असा अंदाज आहे. देश विदेशातील अनेक संस्थांनी या सरोवरावर संशोधन केले आहे. लोणार सरोवर हे बुलढाणा जिल्ह्यापासून ७ किलोमीटर अंतरावर आहे. प्राचीन ग्रंथांमध्ये देखील लोणार सरोवराचा उल्लेख केलेला आहे. लोणार हे महाराष्ट्रातील सात आश्चर्यांपैकी एक आहे.



**संकलन संयोजन**
**सुबोध रणशेवरे**
**संपर्क -९८३३१४६३५६**
**इमेल -**
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
रविवार २६ जुलै २०२६ 

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## ३७ वर्षांनंतरही जाभूलपाडा विनाशपुरी महापुराच्या जखमा ताज्या
## महापुरातील मृतांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहताना मा. तहसीलदार उत्तम कुंभार
## अंबा नदीच्या प्रलयातील ८० गतप्राणांच्या स्मृतीस स्मृतिस्तंभाजवळ अभिवादन

रा. जि. उ. उपसंपादक/मंगेश यादव :सुधागड तालुक्यातील जांभूळपाडा येथील अंबा नदीला २३ जुलै १९८९ रोजीच्या मध्यरात्री आलेल्या विनाशकारी महापुराला शुक्रवारी (ता. २४) ३७ वर्षे पूर्ण झाली. या प्रलयात गतप्राण झालेल्या ८० ग्रामस्थांच्या स्मृती उजळवण्यासाठी उभारण्यात आलेल्या स्मृतिस्तंभाजवळ ग्रामस्थ, शासकीय अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी साश्रू नयनांनी भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.ङ्ग दुर्दैवाचे दशावतार काय असतात आणि एका रात्रीत निसर्गाच्या कोपाने संपूर्ण गाव कसे उद्ध्वस्त होऊ शकते, याचा अत्यंत भयावह प्रत्यय ३७ वर्षांपूर्वी जांभूळपाडावासीयांनी घेतला होता. आजही या महाप्रलयाच्या साक्षीदारांना ती घटना आठवली की अंगावर शहारे येतात आणि डोळ्यांत अश्रू उभे राहतात. या महापुरात अनेकांनी पत्नी, मुले, भाऊ, बहीण, भाची असे रक्ताचे नातेवाईक गमावले, तर कित्येकांचे संसार क्षणात नेस्तनाभूत झाले.ङ्ग एका रात्रीत संपूर्ण जांभूळपाडा गाव जमिनीदोस्त झाले. रस्ते, मंदिरे, शाळा, घरे सर्वकाही पुराच्या दाढेत सापडले. ठिकठिकाणी झाडांना व खिडक्यांना मृतदेह अडकलेले भयावह दृश्य होते. निसर्गाच्या या प्रलयाने संपूर्ण परिसर सुन्न आणि भयभीत करून टाकला होता.ङ्ग त्या काळरात्रीच्या दुःखाश्रूंना वाट मोकळी करून देताना स्थानिक नागरिक जे. बी. पाटील म्हणाले, २३ जुलै १९८९ ची रात्र जांभूळपाडा गावाच्या दृष्टीने काळरात्र ठरली. निसर्गाचा कोप आणि आभाळ फाटणे काय असते, याचा थरार आम्ही अनुभवला. मुंबईवरून कुटुंबासह परतलो तेव्हा नदीला फारसे पाणी नव्हते. मात्र मध्यरात्री अडीच वाजता घरात थेट पाच फूट पाणी शिरले. बघता बघता पाण्याची पातळी आठ ते नऊ फुटांवर पोहोचली. यात माझ्या हातातून बायकोचा हात निसटला आणि ती डोळ्यांसमोर वाहून गेली. तिच्यासोबत पोटातील आठ महिन्यांचे बाळही गेले. मी आणि माझी अडीच वर्षांची मुलगी एका झाडाला अडकल्याने वाचलो. दुसऱ्या दिवशी बबन घरत व ग्रामस्थांनी आम्हाला बाहेर काढले. स्वयंपाकघराच्या खिडकीला लटकून राहिल्याने आई आणि भाची वाचल्या, पण संसार मात्र पूर्णपणे उघड्यावर पडला. शासकीय नोंदीनुसार मृतांचा आकडा ८० असला तरी प्रत्यक्षात शेकडो लोकांनी जीव गमावला होता. या पुराची झळ पालीसह आसपासच्या इतर गावांनाही बसली होती.ङ्ग स्मृतिस्तंभा जवळ आयोजित कार्यक्रमास तहसीलदार उत्तम कुंभार, दिलीप अभ्यंकर, उपसरपंच अरुणा दळवी, ग्रामपंचायत सदस्य सुशील मालुसरे, पोलिस निरीक्षक उत्तम रिकामे, सहा. पोलिस निरीक्षक संजय पाटील, आबा बहाडकर, मिलिंद बहाडकर, प्राचार्य हणमंत चव्हाण, भारती शेळके , ग्रामस्थ तसेच आत्मोन्नती विद्यामंदिर चे विद्यार्थी यांच्यासह अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.







### उपवर्गीकरणाविरोधात रिपब्लिकन पक्षाचे तहसीलदारांना निवेदन

खेड, : अनुसूचित जातीच्या आरक्षणाच्या उपवर्गीकरणाचा निर्णय रद्द करावा, या मागणीसाठी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) खेड तालुक्याच्या वतीने तहसीलदार सुधीर सोनावले यांना निवेदन देण्यात आले. यावेळी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी तहसील कार्यालयासमोर निदर्शने करत 'जय भीम', 'जय संविधान' आणि 'एससी आरक्षणाचे उपवर्गीकरण रद्द करा' अशा घोषणा दिल्या.



निवेदनापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कोकण प्रदेश युवक अध्यक्ष सुशांत भाई सकपाळ यांनी उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जाती समाजात कृत्रिम विभागणी निर्माण होऊन सामाजिक ऐक्याला धक्का बसण्याची शक्यता असल्याचे सांगितले. शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.यावेळी खेड तालुका बौद्ध समाज सेवा संघाचे तालुकाध्यक्ष मंदार हळदे, चंद्रसेन मोहिते, गौतम तांबे, सुरेंद्र तांबे, जितेंद्र तांबे, विकास दुत्रे, गणेश शिर्के, मिलिंद तांबे, गौतम लघु तांबे, दिपेंद्र जाधव यांच्यासह रिपब्लिकन पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाविरोधात दापोलीत निषेध आंदोलन

दापोली प्रतिनिधी :- अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित




प्रक्रियेविरोधात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) दापोलीच्या वतीने आज (दि. २४ जुलै) डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे जाहीर निषेध आंदोलन करण्यात आले.ङ्गङ्गया आंदोलनाचे नेतृत्व रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) जिल्हाध्यक्ष प्रीतम रुके, दापोली तालुका अध्यक्ष राहुल जाधव आणि तालुका सचिव दिनेश रूके यांनी केले. आंदोलनात आंबेडकरवादी कार्यकर्ते, विविध सामाजिक व धार्मिक संघटनांचे प्रतिनिधी, संविधानप्रेमी नागरिक तसेच उपवर्गीकरणाला विरोध करणाऱ्या विविध समाजघटकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.ङ्गङ्गयावेळी राहुल जाधव यांनी शासनाने बदर समितीच्या अहवालाच्या आधारे अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण करण्याचा प्रयत्न हा संविधानाच्या मूलभूत तत्त्वांच्या विरोधात असल्याचा आरोप केला. उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडून त्यांच्या घटनात्मक हक्कांवर गदा येईल, असे त्यांनी सांगितले. दिनेश रूके यांनी शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला. तसेच दिल्लीतील जंतर मंतर येथे झालेल्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठी हल्ल्याचा देखील यावी तीव्र निषेध करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांवर लाटी हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात यावी तसेच केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा अशी मागणी देखील यावेळी करण्यात आली. या मोर्चाला जिल्हाध्यक्ष प्रीतम रुके यांनी संबोधित केले.ङ्गङ्गआंदोलनानंतर शासनाच्या नावाने विविध मागण्यांचे निवेदन तहसीलदार अर्चना बोंबे यांच्याकडे प्रशासनाकरिता सादर करण्यात आले. पोलिस बंदोबस्तात हे आंदोलन शांततेत पार पडले.

### देव्हारे पंचक्रोशी हायस्कूलमध्ये पर्यावरणपूरक कलाकुसरीचा अभिनव उपक्रम

देव्हारे (प्रतिनिधी): आर. व्ही. बेलोसे एज्युकेशन फाउंडेशन, दापोली संचलित देव्हारे पंचक्रोशी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, देव्हारे येथे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्यासाठी पर्यावरणपूरक कलाकुसरीचा अभिनव उपक्रम उत्साहात पार



पडला.ङ्गमुख्याध्यापक श्री. रामचंद्र कापसे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच कार्यानुभव शिक्षक श्री. अमित रसाळ यांच्या संकल्पनेतून व नियोजनातून हा उपक्रम राबविण्यात आला. विद्यार्थ्यांनी नैसर्गिक पानांचा वापर करून आकर्षक हस्तकला वस्तू तयार करत पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश दिला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना मिळाली असून पर्यावरण संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण झाली.ङ्गयावेळी मुख्याध्यापक श्री. रामचंद्र कापसे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत, अशा कृतीशील उपक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांचा विकास होतो, असे सांगितले. कार्यानुभव शिक्षक श्री. अमित रसाळ यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करून पर्यावरणपूरक साहित्याचा अधिकाधिक वापर करण्याचे आवाहन केले.ङ्गया उपक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला असून त्यांच्या आकर्षक कलाकृतींचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

## न्यू इंग्लिश स्कूल भोमच्या १९९५ दहावी बॅचने भरली पालकांची घरपट्टी

उपसंपादक प्रदीप पवार

मराठी शाळेतील विद्यार्थ्यांचा पट टिकवण्यासाठी एक महत्वपूर्ण उपक्रम या माजी विद्यार्थ्यांच्या बॅच कडून आयोजित करण्यात आला होता. यामध्ये चिपळूण तालुक्यातील बिवली, कापरे, पोसरे, दोणवली, भोम व वैजी या गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये कोणत्याही इयत्तेत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी या बॅचकडून शैक्षणिक किट दिले गेले व या विद्यार्थ्यांच्या पालकांची एक वर्षाची घरपट्टी या माजी विद्यार्थ्यांच्या वतीने भरली गेली. तसेच भोम हायस्कूल मधील गरजू विद्यार्थ्यांसाठी मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम सुद्धा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद मयुरी मिलिंद शिर्के (सभापती, महिला व बालकल्याण जिल्हा परिषद रत्नागिरी) यांनी भूषविले. महादेवराव शिर्के विद्यालय भोमचे मुख्याध्यापक कांबळेसर यांनी प्रास्ताविक करून वरील गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामस्थ, पालक, शिक्षक व सर्व विद्यार्थी तसेच शिक्षणप्रेमींनीचे स्वागत केले.

''समाजा पुढे एक वेगळा आदर्श ठेवण्याचा चांगला प्रयत्न या माजी विद्यार्थ्यांनी केला आहे. तसेच यातून मराठी शाळा आणि मराठी भाषा टिकावी या साठी योगदान दिले आहे. मराठी शाळा टिकल्या तर हायस्कूल टिकेल या तत्वावर मराठी शाळेचा पट टिकविण्यासाठी या माजी विद्यार्थ्यांकडून होणारा हा छोटासा प्रयत्न खरच खूप कौस्तुकास्पद आहे '' असे सभापती मयुरी शिर्के यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात म्हटले. ङ्ग सदर कार्यक्रम न्यू इंग्लिश स्कूल भोमच्या सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी या पंचक्रोशीतील सर्व सरपंच, ग्रामसेवक, भोम संस्थेचे पदाधिकारी, मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, संबंधित मराठी शाळेतील प्राथमिक शिक्षक यांचे मोठे योगदान लाभल्याने या सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले. या सर्व माजी विद्यार्थ्यांमध्ये मिलिंद शिर्के, रवी दुपटे, सागर चव्हाण, नितीन मोरे, संतोष तामुंडकर, नाजीम खान, श्रीकांत शिर्के, संदेश मोरे, सचिन रामचंद्र कदम, संतोष जंगम, नयना शिर्के, विश्वास जाधव, मंगेश मोरे, शालिनी मोहिते, स्मृती राणे, विश्वास शीतप, उज्वला बामणे, सुजाता मोरे, आशा गोंधळेकर, दिपक जगन्नाथ चव्हाण, वैशाली विचारे, संतोष माटे, लव मोरे यांचा मोलाचा सहभाग लाभला. समाजातील सर्वांना आदर्शवत असा उपक्रम राबवणाऱ्या या सेवाभावी माजी विद्यार्थ्यांच्या ग्रुपचे शैक्षणिक क्षेत्रातून अभिनंदन होत आहे. शासनाचे व पदाधिकाऱ्यांचे काही प्रमाणात दुर्लक्ष होत असलेल्या प्राथमिक शाळांकडे आस्थेने लक्ष देणाऱ्या या माजी विद्यार्थ्यांना अनेक शिक्षक संघटनांच्या वतीने धन्यवाद दिले जात आहेत.




भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )